**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, (लोहमार्ग) न्यायालय, दौंड यांचे न्यायालयात.**

( पिठासिन अधिकारी दि. स. झंवर )

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २६० व २६३ प्रमाणे समरी फौजदारी खटल्याचे विवरण

**सं. फौ. ख. क्र. २६८६/२०११**
**निशाणी : ३**

| | | |
|---|---|---|
| १. गुन्हा घडल्याची तारीख | : | २८/१०/२०११. |
| २. फिर्याद दाखल तारीख | : | २८/१०/२०११. |
| ३. फिर्यादीचे नांव | : | थॉमस जॉन, निरिक्षक, आर.पी.एफ. सोलापूर. |
| ४. आरोपीचे नांव | : | मंगलदास किसन पवार, वय २५ वर्षे, रा. रामवाडी, सोलापूर. |
| ५. गुन्हा कलम | : | कलम १४४(१) रेल्वे अधिनियम कायदा, १९८९. |

**अपराधाचे विवरण –**

दिनांक २८/१०/२०११ रोजी ०४.०० वाजता तुम्ही गाडी क्रमांक २१६३ डाउनचे वेळी सोलापूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. ३ वर प्रवाशांना विनापरवाना चहा विकत असतांना मिळून आलात व त्यानुसार तुम्ही कलम १४४ रेल्वे अधिनियम १९८९ नुसार शिक्षापात्र गुन्हा केलेला आहे.

**– आरोपीचे प्रतिकथन –**

| | | |
|---|---|---|
| प्र. १ | : | तुम्हाला दाखल केलेल्या फिर्यादीची नक्कल प्रत मिळाली काय? |
| उत्तर | : | होय. |
| प्र. २ | : | तुम्हाला वाचून दाखविलेल्या गुन्हयाचा तपशिल समजला आहे काय? |
| उत्तर | : | होय. |
| प्र. ३ | : | तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ? |
| उत्तर | : | नाही, मला गुन्हा कबूल नाही. |

आरोपीची सही.........................................

**समक्ष**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : ०५/११/२०११.**

**<u>फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १</u>**

<u>मी शपथपूर्वक कथन करतो ते येणेप्रमाणे :</u>

माझे नांव : थॉमस जॉन,

वय : ४० वर्षे, व्यवसाय : निरिक्षक, आर.पी.एफ. सोलापूर

राहण्याचे ठिकाण : सोलापूर.

**<u>सरतपास फिर्यादी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. रब्बानी शेख यांचेकडून</u>**

१. दिनांक २८/१०/२०११ रोजी माझी डयुटी रेडकामी सोलापूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्मवर असतांना ०४.०० वाजता आरोपी हा गाडी क्र. २१६३ डाउनचे वेळी प्रवाशांना विनापरवाना चहा विकत असतांना मिळून आला. मी त्यास बोलावून परवान्याबाबत विचारणा केली असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले. त्यानंतर मी आरोपीस पकडून सहा. उप निरिक्षक श्री. जी.एस.उसरे यांच्या हवाली केले आणि लेखी फिर्याद दिली. आता मला ती फिर्याद दाखविली असून ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आता निशाणी ४ देण्यात आले. चौकशीअंती आरोपीने विनापरवाना प्रवाशांना चहा विकल्याचे निष्पन्न झाले म्हणून मी आरोपीविरुद्ध कलम १४४ रेल्वे अधिनियमानुसार फिर्याद दाखल केली. आरोपी आज रोजी उपस्थित आहे. त्यास मी ओळखतो.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. एस. टी. येरोळ वकील :</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने गाडी क्र. २१६३ डाउनचे वेळी प्रवाशांना चहा विकला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याच्यावर खोटी केस केली व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

३. फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**समक्ष,**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**
**दिनांक : ०५/११/२०११.**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**
**दिनांक : ०५/११/२०११.**

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब.</u>**

प्रश्न क्र. १ : फिर्यादी पक्षातर्फे झालेला साक्षीपुरावा तुम्ही ऐकला काय ?
उत्तर : होय

प्रश्न क्र. २ : थॉमस जॉन (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दि. २८/१०/२०११ रोजी ०४.०० वाजता तुम्ही गाडी क्र. २१६३ डाउनचे वेळी प्रवाशांना विनापरवाना चहा विकत असतांना मिळून आले.
याबाबत तुम्हांस काय सांगायचे आहे?
उत्तर : हे खोटे आहे.

प्रश्न क्र. ३ : सदर साक्षीदार तुमचेविरूध्द का साक्ष देतात?
उत्तर : मला माहित नाही.

प्रश्न क्र. ३ : तुम्हास स्वत:ला शपथेवर साक्ष द्यावयाची आहे का ?
उत्तर : नाही.

प्रश्न क्र. ५ : तुम्हास तुमचे बचावाकरीता साक्षीपुरावा दयावयाचा आहे काय ?
उत्तर : नाही.

प्रश्न क्र. ६ : सदर खटल्याबाबत तुम्हांस आणखी काही सांगावयाचे आहे काय?
उत्तर : नाही.

**समक्ष,**

आरोपीची सही.........................................

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : ०५/११/२०११.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

वरील तपासणी माझेसमक्ष ऐकण्यात व घेण्यात आली असून आरोपीने दिलेला जबाब पूर्णपणे व सत्यतेने नोंदला गेलेला आहे.

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : ०५/११/२०११.**

## — मौखिक न्यायनिर्णय —
( पारित दिनांक ०५ नोव्हेंबर २०११. )

१) आरोपीवर कलम १४४(१) रेल्वे अधिनियम १९८९ अन्वये आरोप ठेवण्यात आलेला आहे.

२) फिर्यादी पक्षाची संक्षिप्त हकिकत येणेप्रमाणे —

दिनांक २८/१०/२०११ रोजी ०४.०० वाजता आरोपी हा गाडी क्र. २१६३ डाउनचे वेळी सोलापूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. ३ वर प्रवाशांना विनापरवाना चहा विकत असताना फिर्यादी श्री. थॉमस जॉन, निरिक्षक, सोलापूर यांना मिळून आला.

३) अपराधाचे विवरण आरोपीस वाचून दाखविले असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व न्याय चौकशी करण्याची मागणी केली.

४) माझेसमक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व त्यावर मी पुढीलप्रमाणे कारणामिमांसहित निष्कर्ष देत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १.दिनांक २८/१०/२०११ रोजी ०४.०० वाजता आरोपी हा सोलापूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. ३ वर विनापरवाना प्रवाशांना चहा विकत असतांना मिळून आल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केले आहे का ? | ... होय. |
| २.आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## *का र ण मि मां सा*

५) **मुद्दा क्रमांक १ :—**

श्री. थॉमस जॉन (फि.सा. क्र.१) यांचे साक्षीमध्ये आले आहे की, दिनांक २८/१०/२०११ रोजी त्याची डयुटी सोलापूर रेल्वे स्थानकावर असतांना सोलापूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. ३ वर ०४.०० वाजता प्रवाशांना विनापरवाना चहा विकत असतांना मिळून आला. त्यानंतर फिर्यादीने सदर आरोपीस परवान्याबाबत विचारले असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले. त्यानंतर फिर्यादीने आरोपीस सहा. उप निरिक्षक श्री. जी.एस.उसरे यांच्या हवाली केले आणि फिर्याद निशाणी क्र. ४ आरोपीविरुद्ध दिली. आरोपीने, तो विनापरवाना चहा विकत असल्याचे नाकारले आहे. परंतु उपरोक्त वेळी आरोपीने त्याची रेल्वे स्थानकावरील उपस्थिती तसेच त्याच्या ताब्यातील चहाचे प्रमाण नाकारलेले नाही. तसेच फिर्याद निशाणी क्र. ४ ही सदर साक्षीदाराने सिद्ध केलेली आहे. फक्त साक्षीदाराच्या उलटतपासामध्ये चहा विकत होता ही बाब नाकारणे, तो चहा विकत नव्हता हे गृहीत धरण्यास पुरेसे नाही. याव्यतिरिक्त फिर्यादीस आरोपीला खोटया प्रकरणात अडकविण्याचे

कोणतेही कारण आरोपीने अभिलेखावर आणलेले नाही. सबब आरोपीची रेल्वे स्थानकावरील उपस्थिती आणि त्याच्या ताब्यात असलेल्या चहाचे प्रमाण लक्षात घेता तो उपरोक्त वेळी सोलापूर रेल्वे स्थानकावर चहा विकत होता हेच सिद्ध होते. सबब मी या निष्कर्षाप्रत पोहोचतो की, आरोपीने सोलापूर रेल्वे स्थानकावर प्रवाशांना विनापरवाना चहाची विक्री करुन कलम १४४ रेल्वे अधिनियमनुसार अपराध केला म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

६) **<u>मुद्दा क्रमांक २:—</u>**

आरोपीस शिक्षेबाबत विचारले असता त्याने प्रार्थना केली आहे की, तो गरीब असून त्याचा हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. त्याचेवर पूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. तसेच तो कुटुंबातील एकटाच कमावता पुरुष आहे. सदरील आरोपीने पूर्वी कोणताही गुन्हा केल्याचे फिर्यादी पक्षाने सिद्ध केलेले नाही. सदरील केसमधील कागदपत्र त्याने पूर्वी गुन्हा केलेला आहे असे सिद्ध करीत नाही. गुन्हयाचे स्वरुप किरकोळ आहे त्यामुळे प्रस्तुतचा गुन्हा आणि आरोपीच्या कौटुंबिक परिस्थितीचा विचार करता माझ्या मते आरोपीस दया दाखविणे योग्य वाटते. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

आरोपीस, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(२) अन्वये, कलम १४४ रेल्वे अधिनियम १९८९ या अपराधाखाली सिद्ध दोषी ठरविण्यात येत असून त्याने सदर अपराधासाठी रुपये ३००/— (एकूण तीनशे रुपये फक्त) दंड भरावा. दंड भरणेस कसूर केलेस तीन दिवसांची साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

**सोलापूर येथील दौरा.**
**दिनांकः ०५/११/२०११.**

**( दि. स. झंवर )**
**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

===OOO===